जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८३७ दिनांक - २९/११/२०२३**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## गणेश बबन लोंढे (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०६ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दि.०४/१०/२०२३ रोजी एस.डी.बार ॲण्ड रेस्टॉरन्ट समोर मंहमदवाडी,पुणे येथे फिर्यादी थांबले असताना १)गणेश बबन लोंढे २)विशाल माधव गोरे ३)माणिक पुरकास्त ४)ऋषीकेश विठ्ठल घाडगे यांनी मनोज साळवी कोठे आहे आमचे त्याचे कडे काम आहे अशी विचारणा केली असता मला माहित नसल्याचे फिर्यादी यांनी त्यांना सांगताच त्यांनी फिर्यादी सोबत वाद सुरु केला. त्यावर फिर्यादी यांनी त्यांना जाब विचारताच त्याचा राग आल्याने त्यांचेपैकी एकाने त्याचेकडील धारधार हत्याराने,तुला आता संपवतो असे म्हणुन फिर्यादी यांचे पाठीवर मारुन जखमी केले व त्यातील एका पांढरे रंगाचा शर्ट घातलेल्या लुकड्या मुलाने जमिल पठाण याला त्याचेकडील धारदार हत्याराने डावे कानावर डावे दंडावर व मनगटावर मारुन गंभीर जखमी केले तसेच हॉटेल मॅनेंजर विकास गोमसाळे याचे पाठीवर धारधार हत्यार मारुन त्यास जखमी करुन शिवीगाळ व आरडा ओरड करत त्यांचेकडील मोटर सायकलवरून निघुन गेले,तेव्हा तेथे पळापळ झाल्याने तेथे दहशतीचे वातावरण निर्माण झाले. त्यावेळी हॉटेल मॅनेंजर विकास याने हॉटेलचे शटर बंद करुन घेतले व हॉटेल मधील कामगार घाबरुन पळुन गेले. म्हणुन वरिल इसमांनी फिर्यादी यांना व जमील पठाण तसेच विकास गोमसाळे यांना धारधार हत्याराने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. म्हणुन फिर्यादी यांनी कोंढवा पोलीस स्टेशन येथे दिले फिर्यादीवरून कोंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि नं.१०१९/२०२३,भादविक ३०७,५०४,५०६, ३४ क्रि.लॉ.अॅ.ॲक्ट कलम ७ आर्म अॅ.कलम ४(२५) हा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **१)गणेश बबन लोंढे वय २३ वर्षे रा. साठे चौक,तरवडे वस्ती,महंमदवाडी,पुणे (टोळी प्रमुख) याने त्याचे इतर साथिदार २)विशाल माधव गोरे,वय २० वर्षे,रा.वेदांत हाईट्स सोसायटी,तरवडे वस्ती,पुणे ३)मयुर माणिक पुरकास्त,वय १८ वर्षे,रा.कृष्णानगर, बुध्दविहार जवळ,पुणे ४)ऋषीकेश विठ्ठल घाडगे,वय २० वर्षे,रा.तरवडे वस्ती,पुणे ५)शुभम नंदु चव्हाण,वय १९ वर्षे,रा.तरवडे वस्ती,बी-६०४,मोहंमदवाडी,पुणे यांनी केला असुन,नमुद गुन्हयात त्यांना अटक करण्यात आलेली आहे. तसेच ६)एक विधिसंघर्षीत बालक (टोळी सदस्य) यास ताब्यात घेवुन बाल न्यायालय येरवडा,पुणे येथे हजर केले आहे.** ७)एक पाहिजे आरोपी आहे.

नमुद आरोपी नामे गणेश बबन लोंढे (टोळी प्रमुख) याने त्याचे साथीदारांसह संघटित गुन्हेगारी टोळी तयारी केली असुन, सदर टोळीने बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती साठी इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देवुन किंवा धाकदपटशा दाखवून किंवा जुलूम जबरदस्ती करून किंवा अन्य अवैद्य मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालू ठेवून, संघटना किंवा टोळी म्हणून संयुक्तपणे संघटित गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार करून, दुखापत किंवा हमला इत्यादी करण्याची धमकी देवुन किंवा हमला इत्यादी करण्याची पुर्वतयारी करून स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत निर्माण करण्याकरीता मागील १० वर्षामध्ये सदर टोळीने संघटितपणे व वैयक्तीकपणे, खुनाचा प्रयत्न, चोरी करणे, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, घातक शस्त्राव्दारे जखमी करणे,बेकायदेशीर जमाव

जमवणे, मालमत्तेचे नुकसान करणे, शिवीगाळ करुन व हत्यारांचा धाक दाखवुन नागरिकांमध्ये दहशत पसरवणे, दरोडयाची तयारी करणे यासारखे गंभीर व हिंसक गुन्हे केलेले आहेत. त्यांचेवर पुणे शहरातील विविध पोलीस स्टेशन येथे शरीरा विरुध्दचे व माला विरुध्दचे गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम कलम ३(१) (ii), ३(२),३(४) चा प्रमाणे कलम वाढविण्यासाठी सदर मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संतोष सोनवणे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करून कोंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि नं. १०१९/२०२३ भादविक ३०७,५०४,५०६,३४ क्रि.लॉ.अ‍ॅ.अ‍ॅक्ट कलम ७ आर्म अ‍ॅ.कलम ४(२५)या गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)**(ii),**३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजन कुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,श्री.शाहुराजे साळवे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-०५,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग विभाग,पुणे,श्री.शाहुराजे साळवे यांचे मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदीप भासले, श्री.संजय मोगले, सहा.पोलीस निरीक्षक, राजेश उसगावकर, गणेश तोरगल, पोलीस उप-निरीक्षक, इकबाल शेख, पोलीस अंमलदार,जगदीश पाटील, राजेंद्र ननावरे, नितीन चव्हाण, प्रदिप बेडीस्कर यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्या नंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे कारणारे व नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ९१ वी कारवाई आहे.**